गोपनीय

अनधिकृत धर्ममंदिरे / प्रार्थना स्थळाच्या बांधकामांना आळा घालणे व ती नष्ट करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्र. एनएपी १०८८/२०५६१/[१२७७] ल-२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ४ एप्रिल, १९९०

वाचा :- [१] शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. अेनएपी १०८५/१०५७८३/[९११] ल-२, दिनांक १४-१०-१९८५.

[२] शासन गोपनीय परिपत्रक पत्र, गृह विभाग [वि.] क्रमांक एसबी-१/डीआयएस ०३७४, दिनांक २०-१-१९७५.

शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. अेनएपी १०८५/१०५७८३/[९११ ल-२, दिनांक १४-१०-१९८५ अन्वये देवळे, मशिदी, चर्च किंवा इतर धार्मिक प्रयोजनासाठी शासकीय जमिनीचे वितरण करण्यापूर्वी तसेच भोगवट्याखाली असलेल्या जमिनीत अशा बांधकामासाठी जमिनीच्या वापरात बदल करण्याकरिता परवानगी देण्यापूर्वी राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीसाठी जिल्हाधिका-यांनी असे प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत. तसेच असे प्रस्ताव पाठविण्यापूर्वी संबंधित पोलीस अधिका-यांचे व इतर संबंधित सक्षम अधिका-याचे अभिप्राय प्रथम घेतलेले असावेत असे स्थायी आदेश आहेत.

२. या प्रकरणी शासन परिपत्रक, गृह विभाग [विशेष], मंत्रालय, मुंबई क्र. विशा-१/डीआयअेस ०३७४, दिनांक २०-१-१९७५ अन्वये देवळे, मशिदी, चर्च किंवा इतर धार्मिक मंदिरे/प्रार्थनास्थळाचे होणारे अनधिकृत बांधकामावर लक्ष ठेवून अशी अनधिकृत बांधकामे तत्काळ काढून टाकण्याबाबत सर्व पोलिस आयुक्त, जिल्हा दंडाधिकारी, विभागीय आयुक्त, पोलिस महानिरीक्षक, इत्यादि अधिका-यांना जरूर त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

३. तथापि, शासनाचे असे निदर्शनास आले आहे की, राज्यात मंदिरे, मशिदी व इतर धार्मिक प्रार्थनास्थळांच्या इमारतीची मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे, सार्वजनिक व रहदारीच्या ठिकाणी व अल्पावधीत पूर्ण केली जात आहेत. अशा बांधकामामुळे त्या भागात जातीय तणावाचे वातावरण व असंतोष निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा बनतो. अशी बांधकामे म्हणजे

कृ. मा. प.

राष्ट्रीय एकात्मता व जातीय एकोपा याला लागलेली एक कीड आहे. अशा अनधिकृत बांधकामावर मागाहून कायदेशीर कारवाई करावयाची झाल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. हे टाळण्यासाठी अशा अनधिकृत बांधकामावर लक्ष ठेवून ती प्राथमिक अवस्थेत असतांनाच काढून टाकणे आवश्यक असून त्या दृष्टीने शासकीय यंत्रणा दक्ष ठेवणे आवश्यक आहे. यास्तव सर्व जिल्हाधिका-यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांच्या कार्यक्षेत्रात यापुढे कोणत्याही मंदिराची, मशिदीची वा इतर प्रार्थनास्थळाची बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. तसे अशी बांधकामे झाल्यास ती प्राथमिक अवस्थेत असतांनाच तत्काळ नष्ट करण्याची कारवाई करावी.

४. हे आदेश सर्व संबंधित अधिका-यांचे निदर्शनास आणून त्यांची तत्काळ अंमलबजावणी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ रा. गो. वर्तक ]

अवर सचिव,

महसूल व वन विभाग.

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी/जिल्हा दंडाधिकारी,

प्रतिलिपी :

सर्व विभागीय आयुक्त,